ePaper

## ठाकरे गटाच्या 'धगधगत्या मशाली'ला शिंदे गट 'ढाल-तलवारी'ने देणार उत्तर




वर्ष - 6 । अंक - 180 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार। दिनांक12 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


**आतील पानांत**


- महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आकर्षक फुलांची सजावट
- बेकायदा फ्लेक्स काढाच !
- वैभवशाली शहराला आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वव्यापी स्मार्ट सिटी बनवण्याचा ध्यास


### रुग्णसेवेचा वसा जपणारे दिपक शर्मा यांची अमूल्य तत्परता

# माणसांच्या गर्दीतील 'देवदूत'!

### डी.एस. के. कुंजबन सोसायटीधारकांनीही जपली 'मानवता'

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**स्पर्धात्मक व धकाधकीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती आपआपल्या नोकरी-व्यावसायात आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त आहे. सुखाच्या- आनंदाच्या क्षणी सर्वजण सहभागी होतात. मात्र, अडचणी काळात आपलेच परके होतात, असा अनुभव ऐकायला आणि अनुभवायलाही मिळतो. परंतु, आजही समाजामध्ये 'मानवता' धर्माचे पालन करणारे 'देवदूत' आहेत. याचा प्रत्यय सामाजिक कार्यकर्ते व आमदार महेश लांडगे यांच्या वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख दिपक शर्मा यांच्या अविरत कार्यातून येतो. पुनावळे-काटेवस्ती येथे डी.एस. के. कुंजबन नावाची सोसायटी आहे. सुमारे ३०० सदनिका असलेल्या सोसायटीत बहुभाषिक नागरिक वास्तव्यास आहेत. या सोसायटीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून काम करणारे महेताब गन्नी मोमीन (वय-४२) यांना 'ऑन ड्युटी' असताना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. प्रचंड अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना नजिकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या सहकाऱ्यांची चांगलीच धावपळ झाली.**





**"रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा" या भावनेतून गेल्या दहा वर्षांपासून समाजसेवा करीत आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे कामकाज करीत असताना अनेक गोरगरिब लोकांची सेवा करण्याची संधी मिळाली, याचे समाधान वाटते. कोविड काळातही कक्षाच्या माध्यमातून शेकडो कुटुंबांना आधार देण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. पुढील काळातही हा मदतीचा वसा जोपासण्याचा आमचा संकल्प आहे.**

**- दिपक शर्मा, प्रमुख, वैद्यकीय सहाय्यता कक्ष, आमदार महेश लांडगे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय.**

### कमी वेळेत मोठ्याप्रमाणात पैसे कुठून आणणार?

हृदयविकाराच्या धक्क्यातून मोमीन यांना सुरक्षित सावरण्यासाठी सुमारे ६० हजार रुपयांचे इंजेक्शन द्यावे लागेल, असे डॉक्टरांनी सांगितले. मात्र, मोमीन यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. एवढ्या कमी वेळेत मोठ्याप्रमाणात पैसे कुठून आणणार? असा प्रश्न निर्माण झाला होता.

### डी.एस.के. सोसायटीने जपली माणूसकी...

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डी.एस.के. कुंजबन सोसायटीचे सचिव श्री. उत्तम नलावडे आणि चेअरमन श्री. योगेश सूर्यवंशी व अभिजीत वाळवेकर यांच्यासह सहकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने पैशांची तजवीज केली. या माध्यमातून एन्जिओग्राफी करण्यात आली. मात्र, अद्याप धोका टळलेला नव्हता. डॉक्टरांनी एन्जिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिला होता. तोपर्यंत मोमीन यांचे मुंबई आणि लातूर येथील नातेवाईक रुग्णालयात दाखल झाले. पाच दिवसांत सुमारे दीड लाख रुपयांचा वैद्यकीय खर्च झाला. आता पैसे कसे उभा करायचे? असे संकट पुन्हा समोर उभा राहीले. सोसायटीधारकांनी वर्गणी जमा करुन पैशाची मदत करण्याची तयारी केली. त्याला सोसायटीतील नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. सुमारे ७५ हजार रुपये इतकी मदत एका दिवसांत सोसायटीतील नागरिकांनी उभी केली.

### दिपक शर्मा मदतीला धावले...

दरम्यान, सोसायटीतील काही नागरिकांनी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख व समाजिक कार्यकर्ते दिपक शर्मा यांच्याशी संपर्क साधला. शर्मा यांनी तत्काळ रुग्णालयात धाव घेतली. सुमारे दीड लाख रुपयांचे बील झाले आहे. नातेवाईक व सोसायटीधारक सर्वांनी प्रयत्न करुन लाखभर रुपये जमा झाले आहेत. मात्र, रुग्णालय प्रशासन बील कमी करण्यास नकार देत आहे, असे गाऱ्हाणे नातेवाईकांनी त्यांच्यासमोर मांडले. क्षणाचाही विलंब न करता शर्मा यांनी थेट मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाला संपर्क केला. त्याद्वारे मुख्यमंत्री सचिवालयाकडून मदतीसाठीचे पत्र घेतले. तसेच, स्थानिक भाजपाचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे स्वीय सहायक श्री. कांबळे यांच्या मदतीने आणि आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून १ लाख ५ हजार रुपयांपर्यंत बील कमी करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर एन्जिओप्लास्टीच्या उपचारासाठी कार्यवाही सुरू केली.



### ...अन् निशुल्क शस्त्रक्रिया यशस्वी झाली!

घरची आर्थिक परिस्थिती बेताची, तीन मुली आणि सर्वसामान्य कुटुंबातील महेताब मोमीन यांच्यावर एन्जिओप्लास्टी ऑपरेशन करावे लागेल. त्यामुळे रावेत येथील ग्लोबल रुग्णालयातून थेट वायसीएममधील रुबी अलकेअर रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. याकामी सर्व कागदोपत्री तयारी दिपक शर्मा यांनी स्वत: उपस्थित राहून केली. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी मोमीन यांच्यावर एन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. खासगी रुग्णालयामध्ये तीन ते साडेतील लाख रुपये खर्च अपेक्षीत असलेले उपचार कोणतेही शुल्क न भरता महात्मा फुले आरोग्य योजनेतून करण्यात आले. मोमीन कुटुंबियांनी सुटकेचा निश्वास सोडला. नातेवाईक आणि सोसायटीधारकांनीही दिपक शर्मा यांच्याप्रती 'दुवा' व्यक्त केली. आता मोमीन यांना घरी सोडण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थीर असल्याचे सांगण्यात आले.

### विधवा, परित्यक्ता, सफाई कामगार, तृतीय पंथी महिलांना मायेचे माहेर

# स्त्री-सन्मानासाठी अनोखा उपक्रम!

### विजेता फाऊंडेशनतर्फे स्तुत्य उपक्रम, अध्यक्षा ॲड. श्वेता विजय इंगळे- सरकार यांची सामाजिक बांधिलकी





**।पिंपरी। महाईन्यूज।**

**"स्त्री प्रित मे राधा बने|**
**गृहस्थी मे बने जानकी।**
**काली बनकर शिश काटे।**
**जब बात हो सम्मान की।**

अगदी ह्याच उक्तीप्रमाणे स्त्रीसन्मानाची आगळीवेगळी पूजा करत विजेता फाऊंडेशनतर्फे एका नव्या अभिनव उपक्रमाने सामाजिक बांधिलकी मायेच्या ममतेने जोपासली आहे. विजेता फाऊंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून नवरात्रीच्या पाचव्या दिवसापासून ते कोजागिरीपर्यंत विधवा, परित्यक्ता, सफाई कामगार, घरकाम करणाऱ्या स्वाभिमानी रागिणी आणि तृतीय पंथी भगिनी अशा १०१ भगिनींच्या स्वाभिमानाची पूजा करून त्यांची मायेचे माहेर म्हणून साडीचोळीने ओटी भरुन नवरात्रीची स्त्री सन्मानाची पूजा करण्यात आली.

यावेळी अध्यक्षा-त्रितीया फाऊंडेशन, हडपसर पुणे. सभासद - मंगलमुखी किन्नर चॅरिटेबल ट्रस्ट पुणे. ह्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली तसेच ह्या भगिनींच्या वतीने महात्मा गांधी आणि महालक्ष्मी यांच्या फोटोचे पूजन करून दिपप्रज्वलन केले त्यावेळी विजेता फाऊंडेशन चे सचिव श्री. विजय इंगळे - सरकार, खजिनदार सौ. लक्ष्मी सूर्यवंशी आणि सदस्य चि. कौन्तेय इंगळे, सौ. आदिती वाघ व विजया कडूस तसेच सत्ता प्रतिष्ठानचे संस्थापक सौरभ शिंदे, सदस्य मयूर तिखे आणि ग्रुप व तृतीयपंथी भगिनी कादंबरी, मन्नत, आरोही, श्रुती, मायरा, सेजल आणि ग्रुप उपस्थित होते.

याप्रसंगी विजेता फाऊंडेशनच्या संस्थापक - अध्यक्ष डॉ. ॲड. श्वेता विजय इंगळे- सरकार म्हणाल्या की, खऱ्या अर्थाने नवरात्रीच्या खऱ्या नवदुर्गांची मी पूजा केली ह्याचे अंतरीक समाधान मला शब्दात व्यक्त करता येणार नाही इतके अमूल्य आहे....! दगडाच्या स्त्रिशक्ती प्रतिकरूपी देवीची पूजा करण्यापेक्षा समाजात उपेक्षित असणाऱ्या माझ्या ह्या भगिनींच्या कर्तव्याची, आत्मसन्मानाची, स्वाभिमानाची आणि माणूस म्हणून जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाची पूजा करुन त्यांची माहेर म्हणून मायेने ओटी भरताना मला मिळालेला आनंद म्हणजेच खरीखुरी नवरात्री मी साजरी केल्याचा आंतरीक आनंद मला वाटतो. आज तृतीयपंथी भगिनींना मी मायेचे माहेर दिले आणि अतिशय आत्मियतेने आणि अंतर्मनातून त्यांचे चरण पूजन केले.

ह्या कार्यक्रमासाठी विधवा व परित्यक्ता भगिनींच्याच्या वतीने श्रीमती मीना मोरे, घरकाम करणाऱ्या भगिनींच्या वतीने मनिषा बिरादार, सफाई कामगार भगिनींच्या वतीने सफाई कामगार मुकादम कविता भोईर आणि तृतीयपंथी भगिनींच्या वतीने कादंबरी - तृतीयपंथी महिला सामाजिक कार्यकर्ती आदी उपस्थित होत्या.

#### संघर्ष हा नवनिर्मितीची सुरुवात...

**संघर्ष हा नवनिर्मितीची सुरूवात असते आणि हे अगदीच जरी खरे असले तरी त्या संघर्षाला मायेची ऊब हवी असते हे देखील काही खोटं नाही..! म्हणूनच अशा संघर्ष करणाऱ्या माझ्या ह्या भगिनींचे मी आज त्यांची बहीण म्हणून कोजागिरी निमित्ताने त्यांचे चरण लक्ष्मीस्वरूप मानून पूजन केले; त्यांच औक्षण केले. आणि मायेचे माहेर म्हणून साडीचोळीने ओटी भरली. हे जे पण काही मी केले ते अगदी अंतर्आत्म्यातून केले आहे. कोणी मला लाखो रूपयांची गिफ्ट दिल्यानेही जो आनंद मला वाटला नसता तो आज मला ह्या भगिनींच्या स्वाभिमानाची पूजा केल्याने वाटला आहे, अशा भावना यावेळी विजया फाऊंडेशनच्या संस्थापक - अध्यक्षा डॉ. ॲड. श्वेता इंगळे-सरकार यांनी व्यक्त केल्या.**

---

## कमी पटाच्या शाळा बंद करण्याविरोधात 'आप'चे आंदोलन

**।पुणे। महाईन्यूज ।**

**पुणे : राज्यातील वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाविरोधात आम आदमी पक्षातर्फे (आप) मंगळवारी आंदोलन करण्यात आले. शासनाच्या विसंगत धोरणामुळे नुकसान होत असून, शाळा बंदचे धोरण जबरदस्तीने राबवल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला.**



राज्यातील वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांची आणि त्या बंद करण्याच्या प्रक्रियेच्या हालचाली सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षातर्फे जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. आप जिल्हा अध्यक्ष मुकुंद किर्दत व ललिता गायकवाड, नीलेश वांजळे, सिमा गुट्टे, सुरेखा भोसले, सतीश यादव, अनिल कोंढाळकर, सुनीता सेरखाने, शंकर थोरात आदी या वेळी उपस्थित होते. शाळा बंदच्या निर्णयाला विरोध करणारी निवेदने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना देण्यात आली.

राज्यातील वीसपेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांची आणि त्या बंद करण्याच्या प्रक्रियेच्या हालचाली सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षातर्फे जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. आप जिल्हा अध्यक्ष मुकुंद किर्दत व ललिता गायकवाड, नीलेश वांजळे, सिमा गुट्टे, सुरेखा भोसले, सतीश यादव, अनिल कोंढाळकर, सुनीता सेरखाने, शंकर थोरात आदी या वेळी उपस्थित होते. शाळा बंदच्या निर्णयाला विरोध करणारी निवेदने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काच्या पूर्ततेसाठी नजीकच्या परिसरात शाळा उपलब्ध करून देणे ही शासनाच्या जबाबदारी आहे. एकाही विद्यार्थ्यावर अन्याय होऊ नये, विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही प्राथमिकता असायला हवी. शाळा बंदच्या निर्णयामुळे ग्रामीण भागातील वंचित, दुर्बल

## महामार्ग, सेवा रस्त्यांवर राडारोडा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईला वेग



**।पुणे। महाईन्यूज ।**

शहराच्या हद्दीतून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर आणि सेवा रस्त्यांवर रात्री अपरात्री राडारोडा टाकणाऱ्यांवर गस्त पथकाकडून करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईला वेग मिळाला आहे. गेल्या दोन महिन्यांत गस्त पथकाने ९४ खटले दाखल केले असून ६५ हजारांचा दंडही वसूल केला आहे.

महामार्ग आणि सेवा रस्त्यांवर काही महिन्यांपूर्वी पर्यंत सातत्याने रात्री राडारोडा टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यासंदर्भात महापालिका आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांची संयुक्त बैठक झाली होती. त्यानुसार सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालय, वारजे-कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय, कोथरूड-बावधन, धनकवडी-सहकारनगर आणि औंध-बाणेर क्षेत्रीय कायार्लयांतर्गत येणारा महामार्ग आणि सेवा रस्त्यांवरील राडारोडा उचलण्याबाबतचे नियोजन करण्यात आले

### भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या भावना

# आम्ही पिंपरी-चिंचवडकर... ‘स्मार्ट सिटी’च्या विकासाचे शिलेदार!

## शहरवासीयांसह मनपा कर्मचाऱ्यांना दिल्या वर्धापन दिनी शुभेच्छा

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**चिंचवड शहराच्या विकासात योगदान देणारा प्रत्येक व्यक्ती ‘स्मार्ट सिटी’च्या यशस्वी वाटचालीचा शिलेदार आहे. त्या ज्ञात-अज्ञात सर्वांप्रति आज महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त कृतज्ञता व्यक्त करतो, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**

पिंपरी-चिंचवड महानगर पालिका स्थापना दिवस आज (दि. ११ ऑक्टोबर) विविध उपक्रमांनी साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार लांडगे यांनी शहरवासीयांसह महापालिका अधिकारी- कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या आहेत. महापालिका वर्धापन दिनानिमित्त आमदार लांडगे यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील स्व. अण्णासाहेब मगर पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सहशहर अभियंता रामदास तांबे, भाजपा कोषाध्यक्ष सचिन तापकीर यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, भोसरी या चार ग्रामपंचायतीचे क्षेत्र एकत्र करून दि.४ मार्च १९७० रोजी पिंपरी-चिंचवड या नवनगराची निर्मिती करण्यात आली. डॉ. श्री. श्री. घारे हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष होते. गेल्या ५२ वर्षांत खेडेगाव ते अत्याधुनिक महानगर अशी या शहराने केलेली प्रगती दिमाखदार आहे.

स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीतून पुणे शहराच्या जवळ औद्योगिक वसाहत विकसित झाली. या उद्योगांमुळे पोटापाण्यासाठी राज्यातूनच नव्हे, तर देशभरातून पिंपरी, चिंचवड, भोसरी, आकुर्डी या परिसरात लोकांचे लोंढे येऊ लागले. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेऊन या परिसरात एक नवनगर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या विकासाच्या वाटचालीत औद्योगिकनगरीचे शिल्पकार म्हणून स्व. आण्णासाहेब मगर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यानंतर अवघ्या १२ वर्षांत नगरपालिकेचे महापालिकेत रुपांतर झाले.



त्यावेळी पवना नदीच्या पलिकडील भागाचाही शहरात समावेश झाला. दि. ११ ऑक्टोबर १९८२ रोजी पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्थापना करण्यात आली. हरनाम सिंग हे महापालिकेचे पहिले आयुक्त व प्रशासक होते. दरम्यान, १९८६ च्या निवडणुकीनंतर ज्ञानेश्वर लांडगे यांना पिंपरी-चिंचवडचे पहिले महापौर होण्याचा मान मिळाला. सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, पिंपळे निलख, रहाटणी, काळेवाडी, थेरगाव आणि वाकड या गावांचाही समावेश झाला. महापालिकेची दि. ११ सप्टेंबर १९९७ रोजी पुन्हा हद्दवाढ झाली आणि तळवडे, चिखली, मोशी, डुडुळगाव, चोविसावाडी, वडमुखवाडी, चऱ्होली, दिघी, बोपखेल, दापोडी, मामुर्डी, किवळे, रावेत, पुनवळे, ताथवडे आदी गावे पालिकेत आली. सध्या एकूण २७ महसुली गावांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची हद्द आहे. या समाविष्ट गावांतील पायाभूत सुविधा सक्षम करण्याचा आमचा संकल्प आहे.

### सर्वपक्षीय नेत्यांचे विकासात योगदान...

पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात अमूल्य योगदान देणारे स्व. अण्णासाहेब मगर, स्व. प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यासह भूमिपुत्रांनी शहराच्या विकासाची धुरा सक्षमपणे सांभाळली. तसेच, महापालिकेतील सर्व आजी-माजी अधिकारी, कर्मचारी यांनाही शहराच्या विकासाचे श्रेय द्यावे लागेल. हा विकासाचा आणि स्वाभीमानाचा वारसा आता नव्या पिढीला पुढे चालवण्याचे आव्हान सक्षमपणे पेलावे लागेल, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

“ औद्योगिक नगरी, कामगार नगरी, बेस्ट सिटी, एज्युकेशन हब, स्पोर्टस सिटी, स्मार्ट सिटी अशी वाटचाल माझ्या शहराने करावी. त्यासाठी आम्ही सर्वजण सकारात्मक भूमिकेतून प्रयत्नशील आहोत. पिंपरी-चिंचवड शहराचा लौकीक आगामी काळात वाढावा. उद्योग-व्यापाराबरोबरच शिक्षण, कला, संस्कृती अशा सर्वच बाबतीत शहराची समृद्धी व्हावी. त्यामाध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाची स्मार्ट सिटी होण्याच्या दिशेने शहराची वाटचाल सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकोप्याने काम केले पाहिजे.

**- महेश लांडगे,**
शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

### युवक राष्ट्रवादीचा 100 पारचा निर्धार

# इम्रान शेख यांचे ‘ब्रँडिंग’ अन् लांडे, वाबळेंना ‘झटका’!

## इंद्रायणीनगरसह शहरात जोरदार शक्तीप्रदर्शन

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहरातील राजकीय पटलावर “अल्पसंख्याक समाजाचा प्रभावी चेहरा” म्हणून माजी महापौर आझम पानसरे यांची ओळख आहे. शहरातील सर्वसमाजाचा सर्वमान्य नेता म्हणून त्यांची आपली कारकिर्द गाजवली. आता त्यांच्या पावलावर पाऊल टाकत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांचे नवे नेतृत्व विकसित होत आहे. मात्र, त्यामुळे मातब्बर राजकारणी माजी नगरसेवक विक्रांत लांडे आणि संजय वाबळे यांचा ‘झटका’ बसला आहे. युवक राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी अनेक बलाढ्य युवा नेत्यांची नावे चर्चेत असताना इम्रान शेख यांनी बाजी मारली. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात शेख यांना शहराच्या नवीन संघटनात्मक बदलामध्ये मोठे पद मिळाले. राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांच्या विश्वसातील



कार्यकर्ता असलेले इम्रान शेख यांनी शहरातील ज्येष्ठ आणि नवोदितांशी जुळवून घेतले आहे.

विशेष म्हणजे, विद्यमान शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि निवडणूक प्रभारी योगेश बहल यांच्या ‘गुडबॉक्स’मध्ये इम्रान शेख आहेत.

### आगामी निवडणुकीत काय होईल?

इंद्रायणीनगर आणि परिसरात राष्ट्रवादीचे माजी आमदार विलास लांडे यांचे सूपत्र माजी नगरसेवक विक्रांत लांडे आणि माजी स्वीकृत नगरसेवक संजय वाबळे हे तीव्र इच्छुक मानले जातात. २०१७ मध्ये झालेल्या अत्यंत प्रतिष्ठेच्या लढतीत वाबळे यांना पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे वाबळे यांनी ‘बारामती कनेक्शन’ आणि स्थानिक भाजपाच्या नेत्यांच्या सहकार्याने स्वीकृत नगरसदस्यपदी संधी मिळवली होती. त्यामुळे वाबळे यांना पक्षाकडून तीनदा संधी मिळाली आहे. विक्रांत लांडे यांचा गेल्या ५ वर्षांतील ‘परफॉर्मन्स’ पाहता विक्रांत यांना राजकीय चढाओढीत स्वारस्य नसल्याचे स्पष्ट जाणवते. त्यामुळे राष्ट्रवादीकडून संधी मिळाल्यास या भागातील राजकीय लढतींचे चित्र बदललेले पहायला मिळेल. विशेष म्हणजे, इम्रान शेख याच भागात वास्तव्यास आहेत. या भागात अल्पसंख्याक समाजाचे मतदान निर्णायक आहे. त्यामुळे अजित गव्हाणे आणि योगेश बहल यांच्या सहकार्याने ‘होम पिचवर’ इम्रान शेख निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकतात.

# वैभवशाली शहराला आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वव्यापी स्मार्ट सिटी बनवण्याचा ध्यास

## पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापना दिनानिमित्त प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांचे मनोगत...




भाग-2

**विविध उपक्रम राबवून जागतिक पातळीवर पिंपरी-चिंचवड शहराची स्वतंत्रपणे ओळख व्हावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छतेकडून समृद्धीकडे प्रवास करताना नागरी सहभागामुळे 'स्वच्छाग्रह' अभियानातून हे शहर देशातील सर्वात स्वच्छ आणि सुंदर शहर होईल असा विश्वास आहे.**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महापालिका शहरामध्ये अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत असते. शहरात आज रोजी ४८ टक्के ग्रीन कव्हर आहे. त्यात आणखी वाढ करण्यासाठी मियावाकी उद्यानांची निर्मिती करण्यात येत आहे. शहरातील काही उद्यानांचे नुतनीकरण केले आहे. तर काही उद्याने पर्यटन केंद्राच्या दृष्टीने नव्याने विकसित केली आहेत. पूर्णानगर येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी उद्यान, सांगवी येथील ८ टू ८० पार्क, संभाजीनगर येथील बर्ड व्हॅली उद्यान अशा काही उद्यानांचा यात समावेश आहे. बर्ड व्हॅली उद्यानात संगीतमय कारंजे आणि लेझर शो सुरु करण्यात आला आहे. तसेच भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी उद्यानातील तळ्याभोवती लावण्यात आलेल्या सौरउर्जेवर प्रकाशित होणाऱ्या नाविन्यपूर्ण विद्युत रोषणाईमुळे हे उद्यान नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहे. महानगरपालिकेने विविध आस्थापनांना कर सवलत देताना स्वच्छाग्रह अभियानात नागरी सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. ग्रीन स्कूल-झिरो वेस्ट या तत्वावर किमान पहिली ते दहावी पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे अशा शैक्षणिक संस्थांच्या इमारतीत कंपोस्टिंग यंत्रणा, झिरो वेस्ट संकल्पना, रेनवॉटर हार्वेस्टिंग व सौरउर्जा प्रकल्प कार्यान्वित असल्यास त्यांना सामान्य करात भरीव सवलत दिली जाणार आहे. अशी योजना सुरु करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका एकमेव महानगरपालिका ठरली आहे.

महापालिकेच्या वतीने 'वेस्ट टू बेस्ट' ही संकल्पना राबविण्यात आली आहे. यामध्ये टाकाऊ वस्तूंपासून सुशोभिकरणासाठी अनेक वस्तू बनविण्यात येत आहे. अनेक उद्यानांमध्ये जुने टायर, वापरलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि इतर भंगार साहित्यापासून सुशोभिकरणाच्या वस्तू बनवल्या आहेत. तसेच शहरातील काही ठिकाणी वेगवेगळ्या थीम आणि संकल्पनेवर आधारित स्मारके तयार करण्यात आली आहेत. यामाध्यमातून नागरिकांमध्ये कचऱ्यापासून नवनिर्मिती या संकल्पनेला प्रोत्साहन मिळत आहे. पिंपरी चिंचवड शहराला क्रीडानगरी म्हणून नावलौकिक मिळवून देण्याच्या दृष्टीने तसेच शहरातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. शहराला क्रीडाभूमी म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण करून देण्याच्या दृष्टीने



महापालिकेच्या वतीने शहरात विविध क्रीडासंबंधी उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने शहरात नुकतेच महापालिका आणि सीएमई यांच्या संयुक्त विद्यमाने रोईंग प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करण्यात आली असून याठिकाणी शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना रोईंग खेळाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. शहरामध्ये हॉकी खेळाचा प्रचार, प्रसार आणि विकास करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने नेहरूनगर येथे मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडीयम या ठिकाणी आंतरराष्ट्रीय हॉकी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. मागील वर्षी महापालिकेच्या वतीने नेहरूनगर येथील मेजर ध्यानचंद हॉकी पॉलिग्रास मैदानावर राष्ट्रीय पातळीवर हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामुळे हॉकी इंडियाच्या वतीने महापालिकेला आंतरराष्ट्रीय हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी देऊ केली आहे. थेरगाव येथील व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अ‍ॅकॅडमीच्या माध्यमातून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण होत आहेत. तसेच शहरातील कुस्तीगीरांना प्रशिक्षण देण्यासाठी भोसरी येथे पै.मारुतराव लांडगे आंतरराष्ट्रीय निवासी कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. त्याचबरोबर याठिकाणी आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्रही उभारण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रांमुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळत आहे.

वाहने चार्जिंग करण्याची सुविधा शहरामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिका २० ठिकाणी खाजगी एजन्सीद्वारे ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणार आहे. इलेक्ट्रीक वाहनांचा अधिक वापर होण्यास प्रोत्साहन मिळावे याकरिता महापालिकेने पुढाकार घेतला असून प्रदूषणमुक्त शहरासाठी हे महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. फायर फायटर मोटार सायकल्समुळे पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातील अरुंद रस्ते, गल्ली, मार्केट परिसर अशा ठिकाणी तातडीने आणि सहजपणे पोहोचून अधिक प्रभावी अग्निशमन सेवा देण्यासाठी मदत होत आहे. घटनास्थळी तातडीने पोहोचण्यासाठी तसेच रस्त्यावरील वाहतूक बाजूला करण्यासाठी ही यंत्रणा या मोटार सायकल्समध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील पोलिसांना गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी पोलीस पेट्रोलिंग ची आवश्यकता असते. यासाठी महापालिकेच्या वतीने पोलिसांना स्मार्ट मोटारसायकल देण्यात आल्या आहेत.

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षिततेचा विचार करून महापालिकेच्या वतीने विविध कार्यालये, रुग्णालये, उद्याने तसेच महत्त्वाच्या चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. अत्याधुनिक यंत्रणेवर आधारीत उच्च तांत्रिक परिमान असलेले व प्रगत देशात उत्पादित केलेले संपूर्ण शहरात ७६६६ चार मेगापिक्सेलचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणारी संपूर्ण भारतामध्ये प्रथम क्रमांकाची महानगरपालिका आहे.

खगोलशास्त्राच्या अभ्यासाकरिता शहरामध्ये चिंचवड येथील विज्ञान केंद्र याठिकाणी तारांगण उभारण्यात आले आहे. विज्ञान केंद्र येथे उपलब्ध असलेल्या विज्ञान विषयक माहितीसह एकाच जागेत खगोलशास्त्र विषयक माहिती विद्यार्थी आणि नागरिकांना उपलब्ध होणार आहे. या तारांगणात आकाशगंगा, पृथ्वीवरील वातावरण, वातावरणातील बदल, आकाशातील ग्रह,तारे,नक्षत्र तसेच ग्रहण याविषयी प्रत्यक्ष ऑप्टोमेकॅनिकल आणि २ डी डिजिटल तारांगण प्रणाली असलेल्या हायब्रीड कॉन्फिगरेशन सिस्टिमद्वारे प्रत्यक्ष अनुभवातून माहिती घेता येणार आहे. संपूर्ण भारत देशातील चार तारांगणांपैकी हे एक तारांगण आहे. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धेत सन२०२१- २२ या वर्षाकरीता राज्यस्तरीय स्पर्धेत प्रशासकीय गतिमानता व सर्वोत्कृष्ट कल्पना या वर्गवारीत महानगरपलिका गटात कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये आधुनिक संकल्पना आणि कार्यपद्धतींचा अंगीकार, गव्हर्नन्स तसेच लोकाभिमुख कार्यालय या उपक्रमांत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावत बहुमान मिळवला. स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत भारत सरकारचे गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय निर्माण भवन, नवी दिल्ली यांच्या वतीने आयोजित " ७ व्या स्मार्ट सिटीज इंडिया २०२२" आणि "२९ व्या कन्व्हर्जन्स इंडिया २०२२" एक्स्पोमध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पीसीएमसी स्मार्ट सारथी उपक्रमाला "ई- गव्हर्नन्स अँड इकोनॉमी" पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहराने शहरी ई-प्रशासन निर्देशांक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. गेल्या दोन दशकांमध्ये पिंपरी चिंचवडने आंतरराष्ट्रीय स्तरावर आयटी हब म्हणून एक नवीन ओळख प्रस्थापित केली आहे. महापौर परिषदेतर्फे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल 'ब' वर्ग महानगरपालिकांच्या गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची प्रथम पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहराला देशातील सर्वांत सुंदर आणि स्वच्छ शहर बनविण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. या वैभवशाली शहराला आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वव्यापी स्मार्ट शहर बनवण्याचा घेतलेला ध्यास निष्ठेने पुढे नेण्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य आणि योगदान निश्चितपणे मिळत असून ते यापुढेही कायम राहील अशी अपेक्षा आहे.

धन्यवाद......!

जय हिंद..जय महाराष्ट्र..!!!

**समाप्त**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

शिंदे गटाच्या वतीने 'ढाल-तलवार' हाही पर्याय देण्यात आला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने या पर्यायाला मान्यता दिली.

# शिंदे गटाला ढाल-तलवार; निवडणूक आयोगाकडून चिन्हाचे वाटप

## अंधेरी-पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवार उभा केल्यास शिंदे गटाला नव्या चिन्हाचा वापर करता येईल,

।नवी दिल्ली ।महाईन्यूज।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला निवडणूक आयोगाने मंगळवारी 'ढाल-तलवार' (एक ढाल, दोन तलवारी) चिन्ह दिले. अंधेरी-पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीत उमेदवार उभा केल्यास शिंदे गटाला नव्या चिन्हाचा वापर करता येईल, असे आयोगाने आदेशपत्रात स्पष्ट केले. निवडणूक चिन्हासाठी शिंदे गटाने 'तळपता सूर्य', 'ढाल-तलवार' आणि 'पिंपळाचे झाड' असे तीन पर्याय आयोगाला सादर केले होते. हे तीनही पर्याय खुल्या यादीतील नव्हते. शिवाय, 'तळपता सूर्य' हे चिन्ह मिझोराममधील 'झोराम राष्ट्रीय पक्षा'ला देण्यात आले आहे. शिंदे आणि ठाकरे गटाने 'उगवता सूर्या'चा पर्याय दिला होता. पण, हे चिन्ह तमिळनाडूतील 'द्रमुक' पक्षाला देण्यात आले आहे. त्यामुळे 'सूर्य' हे चिन्ह शिंदे गटाला देण्यात आलेले नाही. शिंदे गटाच्या वतीने 'ढाल-तलवार' हाही पर्याय देण्यात आला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने या पर्यायाला मान्यता दिली.




निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला सोमवारी 'धगधगती मशाल' हे निवडणूक चिन्ह दिले होते. याआधी शिंदे गटाने 'त्रिशूळ', 'उगवता सूर्य' आणि 'गदा' ही तीन पर्यायी चिन्हे आयोगाकडे सादर केली होती. 'उगवता सूर्य' हे चिन्ह खुल्या यादीत नव्हते, 'त्रिशूळ' आणि 'गदा' या चिन्हांना धार्मिक संदर्भ होता. शिवाय, 'त्रिशूळ' या चिन्हाचा पर्याय ठाकरे गटानेही दिला होता. त्यामुळे शिंदे गटाने दिलेले तीनही पर्याय आयोगाने फेटाळले आणि मंगळवारी नवे तीन पर्याय देण्यास सांगितले होते. त्यानुसार, दिलेल्या चिन्हांमधून आयोगाने शिंदे गटाला 'ढाल-तलवार' चिन्हाचे वाटप केले आहे. आयोगाने ठाकरे गटाला 'शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे' व शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' या नव्या पक्षनावांचे वाटप केले आहे.

निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला सोमवारी 'धगधगती मशाल' हे निवडणूक चिन्ह दिले होते. याआधी शिंदे गटाने 'त्रिशूळ', 'उगवता सूर्य' आणि 'गदा' ही तीन पर्यायी चिन्हे आयोगाकडे सादर केली होती. 'उगवता सूर्य' हे चिन्ह खुल्या यादीत नव्हते, 'त्रिशूळ' आणि 'गदा' या चिन्हांना धार्मिक संदर्भ होता. शिवाय, 'त्रिशूळ' या चिन्हाचा पर्याय ठाकरे गटानेही दिला होता. त्यामुळे शिंदे गटाने दिलेले तीनही पर्याय आयोगाने फेटाळले आणि मंगळवारी नवे तीन पर्याय देण्यास सांगितले होते. त्यानुसार, दिलेल्या चिन्हांमधून आयोगाने शिंदे गटाला 'ढाल-तलवार' चिन्हाचे वाटप केले आहे. आयोगाने ठाकरे गटाला 'शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे' व शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' या नव्या पक्षनावांचे वाटप केले आहे.

> सज्जनांच्या रक्षणासाठी बनूनी ढाल, दुर्जनांच्या संहारासाठी हाती धरू तलवार.
>
> – एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

> ही मशाल अन्याय, गद्दारीला जाळणारी आहे.
>
> – उद्धव ठाकरे, पक्षप्रमुख

### उच्च न्यायालयात आज सुनावणी?

'शिवसेना' हे पक्षनाव आणि 'धनुष्यबाण' हे निवडणूक चिन्ह गोठवण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या हंगामी आदेशाविरोधात ठाकरे गटाने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यासंदर्भात बुधवारी सुनावणी होण्याची शक्यता असल्याची माहिती ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी दिली.

# भाईंदर : मुख्यमंत्र्याच्या कार्यक्रमाला भाजपचा विरोध!

## भाजप माजी आमदारांसह पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळीच केले ठिय्या आंदोलन

।भाईंदर। ।महाईन्यूज।

नाट्यगृहाच्या उदघाटणासाठी मिरा भाईंदर मध्ये आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला चक्क भाजप पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी विरोध केला असल्याची घटना घडली आहे. यात पालिकेने जातीने भाजप पदाधिकाऱ्यांना कार्यक्रमापासून दूर ठेवण्याचा प्रयन्त केला असल्याचे आरोप करत भाजप माजी आमदारांसह पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळीच ठिय्या आंदोलन केले. मंगळवारी दुपारी नाट्यगृहासह पालिका मुख्यालय आणि रुग्णालयच्या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मिरा भाईंदर मध्ये आले होते.त्यानुसार विविध ठिकाणी भूमिपूजनाचा कार्यक्रम करून मुख्यमंत्री 'गानसामग्री भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृहा'त आले. त्यानंतर नाट्यगृहाचे उदघाटन झाल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. नाटगृहाच्या उद्घाटन प्रसंगी कोणताही वाद होऊ नये म्हणून



पालिकेकडून यंदा आजी -माजी सर्व लोकप्रतिनिधीना विशेष आमंत्रण देण्यात आले होते.परंतु माजी आमदार नरेंद्र मेहता व माजी महापौर ज्योत्स्ना हसनाळे हे आपल्या सर्व माजी भाजप नगरसेवकांसह कार्यक्रम स्थळी आले असता त्यांचा प्रवेश सुरक्षा रक्षकांनी नाकारला.

यानंतर काही काळ वाद सुरु राहिल्यांनतर विशेष अतिथी म्हणून निमंत्रण असलेल्या माजी आमदार नरेंद्र मेहता आणि माजी महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांना प्रवेश देण्यास सुरक्षा रक्षकांनी होकार दिला.तर सभागृहात जागा नसल्याचे कारण देत इतर माजी लोकप्रतिनिधीचा प्रवेश नाकारण्यात आला.यामुळे आमंत्रण दिले असताना देखील कार्यक्रमात प्रवेश दिला जात नसल्यामुळे भाजप लोकप्रतिनिधीनी विरोध केला.तर मेहतासोबत त्यांच्या समर्थकांनी नाट्यगृहाच्या गेटवरच ठिय्या आंदोलन आणि कार्यक्रमांची पत्रिका फाडून आंदोलन केले.राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला भाजप कडुच विरोध करण्यात आल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

नाट्यगृहाच्या उद्घाटनासाठी पालिका प्रशासनाकडून निमंत्रण पत्रिका तयार करण्यात आल्या होत्या. मात्र स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी देखील आपल्या कार्यकर्त्यांसाठी स्वतंत्र प्रवेश पत्रिका तयार केल्यामुळे मोठा गोंधळ उडाला. परिणामी नाट्यगृहात प्रताप सरनाईकांच्या कार्यकर्त्यांनी गर्दी करून माजी लोकप्रतिनिधीसाठी आरक्षित ठेवलेल्या आसनांवर ठाम मांडले. त्यामुळे भाजप पक्षाच्या लोकप्रतिनिधीचा जागे अभावी प्रवेश नकरण्यात आला असल्याचे आरोप माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी केले.

# जेपींच्या अनुयायांची काँग्रेसशी हातमिळवणी: शहा

।पीटीआय ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



“स्वत:ला जयप्रकाश नारायण यांचे ‘अनुयायी’ म्हणवणारे त्यांच्या समाजवादी विचारधारेला तिलांजली देऊन, सत्तेसाठी काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसले आहेत,” अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी येथे केली. बिहारमधील महाआघाडी सरकारला त्यांनी यानिमित्ताने टीकेचे लक्ष्य केले.

बिहारमधील सरन जिल्ह्यातील सिताब दियारा हे आणीबाणीविरोधी आंदोलनाचे जननायक जयप्रकाश नारायण यांचे जन्मगाव आहे. जयप्रकाश नारायण यांच्या १२० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमास उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही उपस्थित होते. ‘जेपी’ म्हणून लोकप्रिय असलेल्या या समाजवादी नेत्याच्या १५ फूट उंच पुतळ्याचे अनावरण शहा यांनी केले. ‘लाला का टोला’ येथील ‘जेपी’च्या वडिलोपार्जित घराच्या अंगणात शहा यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर सभेस संबोधित करताना शहा बोलत होते. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यावर त्यांनी यावेळी टीकास्त्र सोडले. शहा म्हणाले, की ‘जेपी’ हे सत्तेसाठी नव्हे तर आपली श्रद्धा असलेल्या विचारधारेसाठी आयुष्यभर लढले. मात्र, त्यांचे नाव वापरून राजकारण करणाऱ्यांनी सत्तेसाठी पाच वेळा आपली भूमिका बदलून सोयीस्कर युती-आघाडी केली. ‘जेपी’नी आयुष्यभर ज्या काँग्रेसशी संघर्ष केला, त्यांचे ‘अनुयायी’ सध्या त्याच काँग्रेसच्या गोटात जाऊन बसले आहेत. ते सत्तालोलुप आहेत. त्यामुळे त्यांना ‘जेपी’च्या विचारधारेशी काही देणेघेणे नाही. ‘जेपी’ना अपेक्षित तळागाळातील दीनदुबळ्यांच्या उन्नयनासाठी फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी सदैव झटत आहेत, असे सांगून शहा म्हणाले, की त्यामुळेच केंद्राने अंत्योदय, उज्ज्वला आदी अनेक योजना सुरू केल्या.

# चीनमध्ये ओमिक्रॉनचा नवा व्हेरियंट सापडला

## जागतिक आरोग्य संघटनेने दिला इशारा

।वुहान ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



चीनमध्ये पुन्हा एकदा कोरोनाने हाहाकार माजवला आहे. चीनमध्ये ओमिक्रॉनच्या नव्या प्रजातीचे रुग्ण वाढले असून ही प्रजात अत्यंत संसर्गजन्य असल्याचं सांगितलं जातंय. Omicron BA.5.1.7 असं या प्रजातीचं नाव असून वायव्य चीनमध्ये याचे रुग्ण आढळून आले आहेत. तसंच, या विषाणूचा प्रसार झपाट्याने होत असल्याची माहिती माहिती रोग प्रतिबंधक आणि नियंत्रण केंद्राचे उपसंचालक ली शुजियान यांनी ग्लोबल टाइम्सच्या अहवालानुसार दिली.

कोरोनाचा संसर्ग सुरू झाल्यापासून नियमित नवनवे व्हेरियंट तयार होत आहेत. कोरोनाचा जन्मही चीनपासूनच झाला. त्यानंतर, अनेक व्हेरियंटही चीनमधून जगभर पसरत आहेत. आता ओमिक्रॉनचा BA.5.1.7 हा व्हेरियंटही चीनमध्ये सापडला आहे. ४ ऑक्टोबरपासून नोंदवलेल्या कोरोना रुग्णांमध्ये हे व्हेरियंट सापडले आहेत. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने अत्यंत संसर्गजन्य BF.7 कोविड उप प्रकाराविरूद्ध देखील इशारा दिली. त्यामुळे, या विषाणूचा अधिक प्रसार होण्याआधीच त्यावर नियंत्रण मिळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, कोरोनावर नियंत्रण मिळवण्याकरता चीनने अनेक शहरांमध्ये लॉकडाउन लावण्यात येणार आहे. जगभर कोरोनाचा प्रसार कमी झालेला असताना चीनमध्ये मात्र पुन्हा एकदा लॉकडाऊनसदृष परिस्थिती निर्माण झाली आहे. 9 ऑक्टोबरला चीनमध्ये 1 हजार 939 कोरोनाबाधित सापडले होते. २० ऑगस्टनंतरची ही सर्वाधिक आकडेवारी आहे.

# मुलायमसिंह यादव यांना अखेरचा निरोपसर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती

**सैफई** : समाजवादी पक्षाचे संस्थापक, माजी संरक्षण मंत्री, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री व ज्येष्ठ नेते मुलायमसिंह यादव यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी त्यांच्या उत्तर प्रदेशमधील जन्मगावी सैफेईमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी जमलेल्या मोठ्या जनसमुदायाने आपल्या नेताजींना साश्रुनयनांनी अखेरचा निरोप दिला. या वेळी सर्वपक्षीय प्रमुख नेते उपस्थित होते. गुरुग्राममधील खासगी रुग्णालयात मुलायमसिंह यांनी सोमवारी अखेरचा श्वास घेतला. त्यानंतर सोमवारी संध्याकाळी त्यांचे पार्थिव सैफई येथे आणण्यात आले होते.

सैफई मेळा मैदानावर या वेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी



# इथेनॉलवर चालणारी पहिली कार भारतात लाँच

## गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यासाठी याचिका दाखल

।बर्लिन ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज देशातील पहिली इथेनॉलवर चालणारी कार लॉन्च केली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत असून, त्यामुळे जनतेच्या खिशावर बोजा वाढत आहे. यासाठी केंद्र सरकारला पेट्रोल आणि डिझेलला पर्याय म्हणून इथेनॉल आणायच्या विचारात आहे. त्यामुळे आज लॉंच झालेल्या कारकडे महागड्या पेट्रोल डिझेलला पर्याय म्हणून पाहिले जात आहे.

टोयोटाने ही कार भारतात फ्लेक्सी-फ्यूल स्ट्रॉंग हायब्रीड इलेक्ट्रिक व्हेइकल्स (FFV-SHEV) म्हणून पायलट प्रोजेक्ट अंतर्गत लॉन्च केली आहे. इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या किफायतशीर आणि परवडणाऱ्या तर असतीलच शिवाय वायू प्रदूषणामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणामही टळण्यास मदत होणार आहे. उसापासून इथेनॉल तयार होते. भारताचा ऊस उत्पादनात जगात पहिला क्रमांक लागतो. देशात उसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत असल्याने इथेनॉलचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ शकते. यासाठी केंद्र सरकार इथेनॉलवर भर देत आहे. इथेनॉलवर चालणारी वाहने मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर आल्याने इथेनॉलची मागणी वाढेल आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढू शकेल असा मानस सरकारचा आहे.

# शहरी नक्षलवाद्यांचा' गुजरात नाश घडवेल

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास, ‘आप’वर जोरदार टीका

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

‘शहरी नक्षलवादी’ चेहरा बदलून गुजरातमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत आहेत, परंतु राज्य त्यांना राज्यातील तरुणांचे जीवन उद्ध्वस्त करू देणार नाही,’ असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी व्यक्त केला. भरूच जिल्ह्यात देशातील पहिल्या औषध निर्मिती उद्योगांच्या ‘बल्क ड्रग पार्क’च्या पायाभरणीसोहळ्यानिमित्त ते बोलत होते. या वेळी त्यांनी आम आदमी पक्षावर जोरदार टीका केली.



**मोदी म्हणाले, की ‘शहरी नक्षलवादी’ नव्या स्वरूपात गुजरातमध्ये घुसण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याने आपली ‘वेशभूषा’ बदलली आहे. ‘शहरी नक्षलवादी’ आमच्या भोळ्या आणि उत्साही तरुणांची दिशाभूल करत आहे. ते येथे पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आम्ही आमच्या तरुण पिढीला वाया जाऊ देणार नाही.**

मोदी म्हणाले, की ‘शहरी नक्षलवादी’ नव्या स्वरूपात गुजरातमध्ये घुसण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याने आपली ‘वेशभूषा’ बदलली आहे. ‘शहरी नक्षलवादी’ आमच्या भोळ्या आणि उत्साही तरुणांची दिशाभूल करत आहे. ते येथे पाय रोवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आम्ही आमच्या तरुण पिढीला वाया जाऊ देणार नाही. देशाला उद्ध्वस्त करू पाहणाऱ्या या शहरी नक्षलवाद्यांपासून आपल्या तरुणांना वाचवायचे आहे. ते ‘परकीय शक्तींचे दलाल’ आहेत. त्यांच्यापुढे गुजरात कधीही झुकणार नाही. गुजरात त्यांचा नाश करेल. २०१४ मध्ये आपण पंतप्रधानपदाची शपथ घेतली तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था जगात १०व्या क्रमांकावर होती पण आज भारत पाचव्या क्रमांकावर आहे, असेही त्यांनी या वेळी सांगितले. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘आप’ने गुजरातला लक्ष्य केले आहे. येथे निवडणुकीत यश मिळवण्यासाठी व राजकीय अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी पक्षाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळेच या पक्षाचे राष्ट्रीय निमंत्रक व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अनेकदा गुजरात दौरा करून भेटीगाठी-सभा घेत आहेत.

# लग्नांच्या चर्चांदरम्यान पार्टीला एकत्र पोहोचले सिद्धार्थ-कियारा;

बॉलिवूडमध्ये पडदयावर जशी अभिनेते अभिनेत्रींची जोडी हिट ठरते त्याचपद्धतीने खऱ्या आयुष्यातदेखील या जोड्या हिट ठरतात. सैफ करीना, रितेश जिनिलिया या जोडयांना प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे. या जोड्या कायमच चर्चेत असतात. सध्या बॉलिवूडमध्ये एकाच जोडीची चर्चा आहे ती जोडी म्हणजे सिद्धार्थ मल्होत्रा कियारा अडवाणी, 'शेरशहा' चित्रपटात ही जोडी आपल्याला पहिल्यांदा दिसली होती. कियारा आडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या नात्याची सोशल मीडियावर सातत्याने चर्चा आहे. दोघे लवकरच विवाह बंधनात अडकणार आहेत.



सिद्धार्थ कियारा नुकतेच दोघे एकत्र एका पार्टीत दिसले. अश्विनी यार्दी यांच्या वाढदिवसाच्या पार्टीत ते दोघे एकत्र येताना दिसले. पार्टीचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे नेटकऱ्यांनी कॉमेटन्सचा वर्षाव केला आहे. कियाराने 'कॉफी विथ करण' शोमध्ये त्यांच्या या नात्याबाबत बरेच खुलासे केले. सिद्धार्थ मल्होत्रा आपल्यासाठी बेस्ट फ्रेंडपेक्षा जास्त काहीतरी आहे अशी कबुली कियाराने या शोमध्ये दिली होती. याच शोमध्ये सिद्धार्थ मल्होत्रादेखील येऊन गेला होता. तेव्हा त्याला कियाराबरोबर लग्नाचा काही प्लॅन असा करण जोहरने विचारला तेव्हा तो म्हणाला 'मी आनंदी आणि उज्वल भविष्याची घोषणा करतो.' असे उत्तर दिले होते. 'शेरशाह' चित्रपटाच्या आधीपासून हे दोघं एकमेकांना ओळखत होते. या दोघांची पहिली भेट करण जोहरच्या एका पार्टीमध्ये झाली होती. 'कॉफी विथ करण'मध्ये या भेटीबद्दल स्वतः करण जोहरनेच सांगितलं आहे. बॉलिवूड लाईफला दिलेल्या मुलाखतीत सिद्धार्थ लग्नाबद्दल असं म्हणाला की 'आता काहीच गुपित राहिलेले नाही. लग्नाबद्दल मी माझे कॅलेंडर एकदा बघतो आणि वेळ आली की माहिती देतो'.कामाच्या बाबतीत दोघे चित्रपटांमध्ये व्यस्त आहेत. 'शेरशाह' चित्रपटानंतर सिद्धार्थ मल्होत्रा पुन्हा एकदा एका सैनिकाचे पात्र साकारणार आहे. करन जोहरच्या धर्मा प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या 'योद्धा' या चित्रपटामध्ये सिद्धार्थ सैन्यातील एका जवानाच्या भूमिकेमध्ये दिसणार आहे. तर कियारा 'सत्यप्रेम की कथा' या आगामी चित्रपटात दिसणार आहे, चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा समीर विद्वांस या मराठमोळ्या दिग्दर्शकावर आहे.

# एक संगीतमय प्रेमकथा 'हृदयी प्रीत जागते'

मराठी मालिका विश्वात विविध विषयांवर मालिका येत असतात. अशीच एक आगळी वेगळी कथा प्रेक्षकांना 'हृदयी प्रीत जागते' या मालिकेतुन पाहायला मिळणार आहे. ही मालिका एक तरुण संगीतमय प्रेमकथा आहे. ही कथा दोन तरुणांची आहे जे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ह्या मालिकेतील नायिका एक निस्वार्थी, प्रामाणिक आणि आज्ञाधारक मुलगी आहे जी एका नम्र कुटुंबातील आहे. तर नायक प्रचंड हुशार, मोहक मुलगा आहे आणि त्याला पाश्चिमात्य संगीताची आवड आहे. हे दोघेही त्यांच्या स्वभावात आणि जीवनशैलीत वेगळे ध्रुव आहेत पण संगीत हा त्यांच्यातील एकमेव समान धागा आहे. नायिका कीर्तन गायिका आहे आणि त्यांच्या घरात कीर्तनाची परंपरा आहे. तर नायक रॉक बँड परफॉर्मर आहे. ही भिन्नता असूनसुद्धा दोघांचंही संगीतावर जीवापाड प्रेम आहे. आता हेच संगीत ह्या दोन आत्म्यांना कसं एकत्र आणते हे बघणं प्रेक्षकांसाठी औत्सुक्याचं असणार आहे.




सिद्धार्थ खिरीद आणि पूजा कातुर्डे ही तरुण जोडी ह्या मालिकेच्या निमित्ताने प्रथमच मुख्य भूमिकेत दिसणार आहे. ह्या मालिकेचे लेखन केलं आहे अभिजीत शेंडे यांनी, तर झी मराठीवर अनेक सुपरहिट मालिका देणारे दिग्दर्शक मंदार देवस्थळी यांनी या मालिकेचं दिग्दर्शन केलं आहे. या मालिकेची निर्मिती केली आहे राजेश जोशी यांनी ही मालिका ७ नोव्हेंबर पासून झी मराठीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# कोई इतना बेदर्द कैसे बन जाए...'

बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला आणि भारतीय क्रिकेटर ऋषभ पंत यांचे नाव मागील अनेक दिवसांपासून जोडलं जात आहे. या दोघांनीही कधीही याबाबत काहीही खुलासा केला



नाही. परंतु मागील काही दिवसांपूर्वी दोघांनीही एकमेकांचं नाव न घेता सोशल मीडियावरुन अनेक टोमणे मारले. या सोशल मीडिया वॉरच्या सोशल मीडियावर तुफान चर्चा रंगल्या होत्या. उर्वशी रौतेलाच्या सोशल मीडिया पोस्ट पाहून युजर्स तिचं नाव ऋषभ पंतसोबत जोडतात. दरम्यान, नुकतीच उर्वशीने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एकामागे एक अनेक पोस्ट शेअर केल्या आहेत. या पोस्टमध्ये तिने तिचा सुंदर फोटो शेअर केला आहे आणि त्याखाली कॅप्शनमध्ये शायरी लिहिली आहे. त्यातील एका फोटोखाली उर्वशीने लिहिलंय की, 'कोई इतना बेदर्द कैसे बन जाए कि किसी की तड़प पर किसी को तरस ना आए', तर दुसऱ्या फोटोखाली लिहिलंय की, 'आइना आज फिर रिश्वत लेते हुए पकड़ा गया, दिल में दर्द था और चेहरा हंसता हुए पकड़ा गया'. या दोन्ही शायरी वाचल्यानंतर युजर्स उर्वशीचं नाव पुन्हा ऋषभ पंतसोबत जोडू लागले आहेत.

# कतरिना, सिद्धांत चतुर्वेदी आणि ईशान खट्टर यांच्या 'फोन भूत'चा ट्रेलर प्रदर्शित

कतरिना कैफ, सिद्धांत चतुर्वेदी आणि ईशान अभिनीत 'फोन भूत'च्या पहिल्या पोस्टरपासूनच प्रेक्षक चित्रपटाची झलक पाहण्यासाठी उत्सुक आहेत. दर्शकांची उत्सुकता लक्षात घेऊन निर्मात्यांनी 'फोन भूत' चित्रपटाचा ट्रेलर आज प्रदर्शित केला. प्रेक्षकांमध्ये हॉरर कॉमेडी या मनोरंजक शैलीसाठी हा चित्रपट चर्चेत असतानाच, कतरिना कैफला प्रथमच सुंदर भूताच्या रुपात पाहण्यासाठी देखील प्रेक्षक उत्सुक आहेत. अखेरीस, आता प्रतीक्षा संपली असून, निर्मात्यांनी आज 'फोन भूत'चा विस्मयकारक ट्रेलरचे अनावरण केले आहे. दर्शकांसाठी हा ट्रेलर खरोखरच अनोखा असून, यामध्ये सिद्धांत चतुर्वेदी आणि इशान खट्टर भूत शिकारीचा विशिष्ट भूमिकेत दिसणार आहेत. सिद्धांत चतुर्वेदी आणि इशान खट्टर जेव्हा जगातील सर्वात सुंदर भूत कतरिना कैफला भेटतात तेव्हा एक भयकारी प्रवास सुरु होतो. ट्रेलरमधील धम्माल पाहताना प्रेक्षकांना एकीकडे कतरिना स्वतःची खिल्ली उडवताना



दिसते आणि दुसरीकडे अनेक भयानक अनुभवांदरम्यान देखील हसू येईल. 'भूल भुलैया 2' नंतर प्रेक्षकांना 'फोन भूत' हा हॉरर कॉमेडीपट पाहायला मिळणार असून प्रेक्षकांनी या मनोरंजक आणि मजेदार शैलीवर प्रचंड प्रेम दाखवले आहे. गुरमीत सिंग दिग्दर्शित आणि रविशंकरन आणि जसविंदर सिंग बाथ लिखित, 'फोन भूत' हा चित्रपट रितेश सिधवानी आणि फरहान अख्तर यांच्या एक्सेल एंटरटेनमेंटद्वारा निर्मित आहे.

## शॉर्ट न्यूज »

### यजमान भारताची अमेरिकेशी सलामी :

।भुवनेश्वर। महाईन्यूज



'फिफा'च्या वतीने घेण्यात येणाऱ्या कुमारी (१७ वर्षांखालील) विश्वचषक फुटबॉल स्पर्धेला मंगळवारपासून सुरुवात होणार असून यजमान भारतापुढे सलामीला बलाढ्य अमेरिकेचे आव्हान असेल.

या स्पर्धेचे यजमानपद टिकविण्यासाठी भारताला बऱ्याच अडथळ्यांचा सामना करावा लागला. भारतीय संघाकडे अनपेक्षित आव्हान उभा करणारा संघ म्हणूनच बघितले जाईल; पण घरच्या मैदानावर खेळताना ते आपला खेळ उंचावू शकतात. भारतीय संघ यंदा कुमारी विश्वचषकात पदार्पण करणार असून मोरोक्को आणि टांझानिया हे अन्य दोन संघही प्रथमच या स्पर्धेत खेळतील. पहिल्या दिवशी भारत-अमेरिका सामन्यापूर्वी मोरोक्को आणि ब्राझील, तसेच चिली आणि न्यूझीलंड यांच्यात सामने होणार आहेत.

# टीम इंडियाने मालिका जिंकली!

## दक्षिण आफ्रिकेचा 7 गडी राखत दारुण पराभव

**सिल्हेट। महाईन्यूज । वृत्तसंस्था**



कुलदीप यादवच्या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर भारताने तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ७ गडी राखून पराभव केला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता आणि गोलंदाजांनी कर्णधार शिखर धवनचा विश्वास सार्थ ठरवला. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात दक्षिण आफ्रिकेची भारताविरुद्ध ही सर्वात निच्चांकी धावसंख्या आहे. भारताने आफ्रिकेला ९९ धावांवर सर्वबाद केले. याआधी १९९९ साली त्यांनी भारताविरुद्ध ११७ धावा केल्या होत्या. तर एकदिवसीय क्रिकेटमधील ही त्यांची चौथ्या क्रमांकाची निच्चांकी धावसंख्या ठरली आहे. चार गडी बाद करण्याऱ्या कुलदीप यादव याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. तीनही सामन्यात उत्कृष्ट गोलंदाजी करणारा मोहम्मद सिराज मालिकावीर ठरला.

या मालिकेतील अंतिम आणि निर्णायक सामना आज दिल्लीतील अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर झाला, जिथे गेल्या काही दिवसांपासून सतत पाऊस पडत होता. आज मात्र पावसाने थोडी विश्रांती घेतली असली तरी मैदान ओलसर असल्याने नाणेफेक उशिरा करण्यात आली. साधारण अर्धा तास सामना उशिराने सुरु झाला. दिल्ली येथे खेळल्या जाणाऱ्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने आफ्रिकेला धूळ चारत धवनच्या नेतृत्वाखाली मालिका खिशात घातली. धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार शिखर धवन पुन्हा एकदा अपयशी ठरला व ८ धावांवर धावबाद झाला. मागील सामन्यात आक्रमक ९३ धावांची खेळी केलेल्या इशान किशनला फॉर्चुनने १० धावांवर बाद केले.

# जिद्दी शाहबाज!

## वडील इंजिनिअर व्हायला सांगत होते आणि तो झाला क्रिकेटर

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील रांचीमध्ये खेळलेला दुसरा एकदिवसीय सामना शाहबाद अहमदच्या आयुष्यातील सर्वात सुंदर दिवस होता. हरियाणाच्या पलवल येथील रहिवासी असलेल्या शाहबाजने भारतासाठी पदार्पण केले. पदार्पणाच्या सामन्याने त्याचे सर्वात मोठे स्वप्न पूर्ण झाले, परंतु त्याच्या वडिलांची प्रतिक्रिया थोडी वेगळी आहे. शाहबाजचे वडील आपल्या मुलाच्या यशाने खूश आहेत, पण आजही त्यांना अभ्यास सोडून क्रिकेट खेळण्याची बाब मान्य करता येत नाही.

भारतासारख्या देशात प्रत्येकालाच असं वाटत की, एक दिवस मी सुद्धा भारतीय संघाकडून क्रिकेट खेळणार पण सर्वानाच ते शक्य होत नाही. पण एका यशस्वी क्रिकेटपटूला कोणत्या दिव्यातून जावं लागत याची जाणीव शाहबाजच्या वडिलांना होती. म्हणून इंडियन एक्स्प्रेसशी संवाद साधताना शाहबाजचे वडील अहमद जान म्हणाले की, त्यांच्या घरात अभ्यासाला खूप महत्त्व दिले जात होते आणि शाहबाज स्वतःअभ्यासात खूप हुशार होता. शाहबाजला १०वीत ८० टक्के आणि १२वीत ८८ टक्के गुण मिळाले होते. मात्र, त्यानंतर त्याने क्रिकेटकडे वळण्याचा धक्कादायक निर्णय घेतला." अहमद जान पुढे असे म्हणतात, "माझे वडील मुख्याध्यापक होते. मी सरकारी नोकरी करतो. माझा भाऊ शिक्षक आहे आणि माझी मुलगी डॉक्टर आहे. मी स्वप्नातही विचार केला नव्हता की शाहबाज आपले शिक्षण सोडून क्रिकेट खेळेल. कोणाचे वडील असा विचार करतील की, आपल्या मुलाने क्रिकेट खेळण्यासाठी आपला अभ्यास सोडून फक्त क्रिकेटच खेळत राहावे."

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही